# University of Mumbai

डीआर/पीआर/१०३९/२०१०.
दिनांक - ०६ सप्टेंबर, २०१०.

## शिक्षक दिन- प्रेस नोट

### " शिक्षक दिन संकल्पनेला मा. कुलगुरुंनी दिले नवे आयाम ''

दिनांक ०५ सप्टेंबर रोजी भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती, जगमान्य थोर तत्वज्ञ आणि " शिक्षक'' पदाला भूषण मिळवून देणारे थोर आचार्य डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीला परंपरेनुसार मुंबई विद्यापीठात " शिक्षक दिन '' मोठया उत्साहात संपन्न झाला.

मा. कुलगुरुंनी शिक्षक दिनाची मुळ संकल्पना विशद करतांना विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्यल आदर व्यक्त करावयाचा हा विशिष्ट दिवस असल्याचे स्पष्ट करीत या पुढील शिक्षक दिनाच्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा परिपूर्ण सहभाग राहील असा धोरणात्मक निर्णय घेत शिक्षक दिनाच्या संकल्पनेला एक चांगले आयाम प्राप्त करुन दिले.

शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थीनी अर्चना जोशी व विद्यार्थी गुरुदास बोरवाडकर यांचे अभ्यासपूर्ण भाषण समस्त विद्यार्थी वर्गाची शिक्षणपद्धतीबद्यल असलेली मनोभावना व शिक्षकांप्रती आदर व्यक्त करणारे ठरले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधीत, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षीका पुरस्कार हा डॉ. (श्रीमती) चित्रा नटराजन यांना तर ग्रामीण विभागाचा पुरस्कार प्रा.(श्रीमती) सुरेखा रमाकांत अंबाडे यांना मा. कुलगुरु यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या सकस आणि प्रेरक विचारांतून घेतलेला वारसा, संस्कृती संक्रमाणाची वाटचाल करीत, " मुंबई विद्यापीठ '' शैक्षणिक चळवळीत महत्त्वाचे योगदान देत नेतृत्व करेल, या शुभचिंतना बरोबरच, डॉ. राधाकृष्णन- या भारत रत्नाला त्यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ मुंबई विद्यापीठाने भावपूर्ण आदरांजली दिली.

कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाचे पदाधिकारी मा. अधिसभा सदस्य, कर्मचारी, विविध कॉलेजचे प्राचार्य व विद्यार्थी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.

उपकुलसचिव,
जनसंपर्क विभाग

विक्रम/मराठीपत्र/०६०९१०.